# प्रस्तावित मुमरी धरण, मौजे सारंगपुरी, ता.शहापूर, जि. ठाणे, या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रस्तावित मुमरी धरण, मौजे सारंगपुरी, ता.शहापूर, जि. ठाणे, या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव, कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग क्र.१, भातसानगर यांचेमार्फत म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीचे आयोजन दिनांक ०६.१०.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता, करमणूक केंद्र, भातसानगर वसाहत, ता.शहापूर, जि. ठाणे, येथे करण्यात आले. या जनसुनावणीकरता गठीत केल्या गेलेल्या समितीचे सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. अशोक शिनगारे,<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, ठाणे<br>(जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचे प्रतिनिधी) | समिती अध्यक्ष |
| श्री. सुजीत ढोलम,<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | समिती समन्वयक |

उपस्थित अधिकारी वर्गामध्ये डॉ. जि.बा. संगेवार, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण व श्री. संजय सरवदे, उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचा समावेश होता

**पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी समितीचे समन्वयक श्री. सुजीत ढोलम,** यांनी सर्व उपस्थित नागरिक व अधिकाऱ्यांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कामकाजास सुरूवात केली. जनसुनावणीच्या प्रक्रियेबाबत त्यांनी माहिती दिली. प्रस्तावित मुमरी धरण, मौजे सारंगपुरी, ता.शहापूर, जि. ठाणे, या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव, कार्यकारी अभियंता, भातसा धरण, विभाग क्र.१, भातसानगर यांचेमार्फत म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झाला होता. केंद्र सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाचे १४ सप्टेंबर, २००६ च्या

नोटिफिकेशनमधील तरतुदींनुसार वर्तमानपत्रामध्ये जाहीर सुनावणीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक ०४.०९.२०१५ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक फ्री प्रेस जर्नल, त्याप्रमाणे दिनांक ०५.०९.२०१५ रोजीच्या मराठी दैनिक तरूण भारत या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्यांकन व त्याचे इंग्रजी व मराठी सारांश, प्रकल्प विषयचे इतर दस्ताऐवज, लोकांचे संदर्भ व अभ्यासाकरिता खालील कार्यालयांमध्ये ठेवण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, जिल्हा परिषद, ठाणे, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, ठाणे, तहसिल कार्यालय, शहापूर, पंचायत समिति, ता.शहापूर, जि. ठाणे, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण, मुख्यालय मुंबई, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई, ग्रामपंचायत कार्यालय, (मौजे सारंगपूरी व खैरे), ता. शहापूर, जि. ठाणे, ग्रामपंचायत कार्यालय, (मौजे जुनवणी व साकडबाव), ता. शहापूर, जि. ठाणे, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे कोठारे, ता. शहापूर, जि. ठाणे, संबंधित व्यक्तींना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची माहिती मिळावी व अभ्यास करता यावा या उद्देशाने सदर अहवाल या कार्यालयांमध्ये जनतेस संदर्भाकरिता उपलब्ध करून दिले होते. तसेच या विषयी सुचना/टिप्पणी/ हरकती सादर करण्याची विनंती केली होती. जाहीर सुनावणी दरम्यान प्रकल्प प्रवर्तकांचे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाविषयीच्या सुचना/हरकती करता येतील, अशी माहिती दिली. जनसुनावणीचे इतिवृत्त हे पर्यावरण विभागाला सादर करण्यात येईल. या समितीचा उद्देश जनतेने उपस्थित केलेल्या हरकती /टिप्पणी, सुचना याची इतिवृत्तामध्ये नोंद घेउन शासनास सादर करणे हा असून प्रस्तावित प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेण्याकरिता सदर समिती नसल्याचे सांगितले. यानंतर समिती समन्वयक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण करण्यास सांगितले व अध्यक्ष महोदयांना जनसुनावणीची सुत्रे हाती घेण्याची विनंती केली.

**अध्यक्ष महोदयांनी** उपस्थित नागरिकांना जनसुनावणीचा उद्देश व प्रक्रिया याविषयी माहिती दिली. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाबाबतच्या तांत्रिक बाबींचे स्पष्टीकरण देणारे सादरीकरण करावे. यानंतर नागरिकांनी त्यांचे हरकती/सुचना/टिप्पणी नोंदवाव्यात, त्या लेखी स्वरूपात देखील मांडाव्यात, म.प्र.नि.मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ते स्विकारून त्याची पोच दयावी. प्रकल्प प्रवर्तकांनी सदर हरकतीविषयी स्पष्टीकरण द्यावे.

प्रस्तावित प्रकल्पविषयक सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर चर्चासत्र केले जाईल. उपस्थित नागरिकांनी प्रकल्पाविषयीचे सादरीकरण शांतपणे ऐकावे व सनदशीर मार्गाने त्यांच्या सुचना नोंदवाव्यात. यानंतर प्रकल्पाचे सादरीकरण करण्याबाबत सुचना करण्यात आल्या.

मिटकॉन कन्सल्टंसी यांचे प्रतिनिधी श्री. अधिकराव येवले, यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. सादरीकरणामध्ये खालील बाबींचा समावेश होता. प्रस्तावित भौगोलिक वैशिष्टये व धरणाचे ठिकाण, धरणाचा नकाशा, पाणलोट, बुडीत व सिंचन क्षेत्र, पर्यावरण अभ्यास, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा इत्यादी मुद्दयांचा सादरीकरणामध्ये समावेश होता. सादरीकरण सुरू असताना उपस्थित जनसमुदायाने सदर प्रकल्पास विरोध असल्याचा व जनसुनावणीचे कामकाज बंद करण्याबाबत घोषणा दिल्या. सदर घोषणाबाजीमुळे प्रकल्पाचे सादरीकरण अर्धवट थांबविण्यात आले. जनसमुदायामध्ये उपस्थित श्री. पद्माकर नामदेव केवारी, अध्यक्ष मुमरी धरण संघर्ष समिती यांनी माईकद्वारे नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले व लोकांच्या विरोधाबाबत भाषण केले.

<u>**श्री. पद्माकर नामदेव केवारी, अध्यक्ष मुमरी धरण संघर्ष समितीः—**</u>

सादरीकरणामध्ये दिली गेलेली त्याप्रमाणे पर्यावरण अहवालामध्ये दिलेली माहिती ही चुकीही आहे. सदर प्रकल्पाबाबत बैठक घेतांना प्रकल्पग्रस्त गावामधील शेतकऱ्यांना व आमदार, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले गेले नाही. आजच्या जनसुनावणी दरम्यान सादर होणाऱ्या (Presentation) सादरीकरणाला आमचा सर्व शेतकऱ्यांचा विरोध आहे. वर्तमानपत्रात जे दिले ते आम्हाला माहित नाही आणि त्याबाबत एकाही शेतकऱ्याला विश्वासात घेतले नाही. शहापूर तालुक्यामध्ये पाच ते सहा बंधारे आहेत. ज्या ठिकाणी मोठा बंधारा असेल त्या ठिकाणापासून दहा किलोमीटरच्या अंतरावर दुसरा बंधारा घेऊ शकत नाही. या ठिकाणी दोन किलोमीटर सुध्दा अंतर भरत नाही आणि तो तुम्ही नियमात दाखविता.

भातसा धरणाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पंचवीस ते तीस वर्षापासून अद्यापही प्रलंबित आहे. आजही प्रकल्पबाधित शेतकरी वाऱ्यावर फिरतोय. शासनाने त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी एकही पाउल पुढे टाकले नाही. आमचा पुनर्वसनाचा

प्रश्न सोडविण्यासाठी जी जागा नियोजित केली आहे ती जागा आम्हाला दाखविली गेली नाही. यावरून असे दिसून येते की, शासन आमच्या अज्ञानपणाचा फायदा उचलत आहे.

आमचा धरणाला तीव्र विरोध आहे. शासनाला आज पाण्यापासून एवढे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नापैकी एक गॅलन पाण्यासाठी एक पैसा एवढी रक्कम जरी बाधित शेतकऱ्यांवर खर्च केली तरी पुरेसा आहे. कल्याण महानगरपालिका व इतर महानगरपालिकांना येथून पाणी जाते त्या महानगरपालिकांमध्ये शहापूर ता ुक्यातील किती मुलांना नोकऱ्या मिळाल्या. आम्ही या देशाचे दऱ्या–खोऱ्यात राहणारे नागरिक आहोत. आदिवासी कायद्याप्रमाणे जेथे विरोध आहे तेथे बंधारा करावयाचा नाही. तुमचे Presentation तयार आहे. कागदपत्र पुर्ण तयार आहेत. परंतु ही सगळी माहिती खोटी आहे. आणि एका रूममध्ये बसून तयार झालेली आहे. आपली नियोजित मिटिंग व्हायला पाहिजे पण तत्वतः एकही माहिती खरी नाही.

शहापूर तालुक्याची दिवसेंदिवस परिस्थिती ही मराठवाडयासारखी होत चालली आहे. पाण्याची परिस्थिती बिकट होत चालली असतांना (Presentation) सादरीकरण मध्ये चांगली बाजू मांडली जात आहे. आतापर्यंत अनेक प्रश्न प्रलंबित आहे. त्या प्रश्नांबाबत आपल्या बैठका झाल्या परंतू त्यातून आमचे समाधान झाले नाही. शेतकऱ्यांचे जे प्रश्न आहेत ते सोडवायला शासन एक पाउल पुढे येणार नसल्यास आमची हक्काची जमिन कशी देणार?.

आज इथे जे घडतय तेच प्रोसिडींग मध्ये आलं पाहिजे. अहवालामध्ये दिलेली ३४ घरे बाधीत होतात, ही माहिती चुकीची आहे. बुडीत क्षेत्रामध्ये पठार जमीन मोठया प्रमाणावर आहे व लोकसंख्याही जास्त आहे. चार ग्रामपंचयातमधील तेरा पाडयांचा समावेश आहे. येथील असंख्य शेतकरी जमीन गेल्याने व बुडीताखाली गेल्याने देशोधडीला लागतील. याठिकाणी उपस्थित जनसमुदायाने प्रकल्पास विरोध नोंदविला असून त्याची नोंदणी इतिवृत्तामध्ये व्हावी.

जनसुनावणी थांबवावी. प्रस्तावित धरणाचे स्थान भुकंप प्रवण क्षेत्रामध्ये असून व हा बंधारा मातीचा आहे त्यामुळे या प्रकल्पास भुकंपापासून धोका आहे.

या प्रकल्पातील संभावित प्रकल्पग्रस्तांना जागा, नोकरी दिली गेली पाहिजे त्याबात कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. धरणाद्वारे अडविलेले पाणी मे. कोका कोला सारख्या उद्योगांना दिले जाते, मात्र प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. आम्हाला नोकऱ्या दया, आम्ही प्रकल्पासाठी जेवढी जागा देणार आहोत त्या मोबदल्यात तेवढीच दुसरी जागा परत मिळाली पाहिजे तसेच जेवढी जागा जाते आहे तेवढी जागा भाडेतत्वावर घेण्यात यावी असा देखील प्रस्ताव ठेवण्यात आला होता. यावर पुढे काही कार्यवाही झालेली दिसून आली नाही. सदर प्रकल्पास संपूर्णपणे विरोध आहे.

**श्री. नारायण महाळुंगे, सदस्य मुमरी धरण संघर्ष समिती:—**

मी एक भातसा प्रकल्पग्रस्त आहे. भातसा प्रकल्पामध्ये माझी जमीन गेली असून गेल्या ४६ वर्षांपासून आजतागायत पुनर्वसन झालेले नाही. भातसा धरण प्रकल्पामध्ये अनेक शेतकऱ्यांची जागा व घरे गेली, मात्र रोजगार मिळाला नाही. पुनर्वसन झाले नाही. शहापूर तालुक्यामध्ये तानसा व वैतरणा नदया असुनसुध्दा येथील गावांमध्ये पाणी टंचाई आहे. या नदयांचे पाणी मुंबईला दिले जाते.

यानंतर श्री. पदमाकर नामदेव केवारी यांनी जनसुनावणीस उपस्थितांचे दोन हजेरीपट करावे अशी विनंती केली. जेणेकरून प्रकल्पास विरोध व प्रकल्पास संमती असणारे असे दोन्ही जनसमुदयांच्या वेगवेगळया नोंदवहीत स्वाक्षरी घ्यावीत. यास अध्यक्ष महोदयांनी संमती दर्शविली व दोन्ही वेगळया नोंदवहीमध्ये उपस्थित जनतेच्या स्वाक्षऱ्या घेण्याबाबत सुचना केल्या.

**श्री. गणपत खडके, उपाध्यक्ष, मुमरी धरण संघर्ष समिती:—**

येथील गावांमधील लोकांना पिण्याचे पाणी दिलेले नाही. प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिलेला नाही, जमीन दिलेली नाही, पुनर्वसन झालेले नाही. शासनाकडून प्रकल्पग्रस्तंना दिलेल्या आश्वासनांची पुर्तता होत नाही. सदर प्रकल्पामध्ये जमीनी गेल्यामुळे रोजगाराचा प्रश्न उदभवेल व तीव्र जनक्षोभ होईल अशी सुचना केली.

**मा. आमदार, श्री. पांडूरंग बरोरा.**

शहापूर तालुक्यातील गावांमध्ये पाणी प्रश्न बिकट आहे. या तालुक्यातील नदयांचे पाण्याचा उपयोग मुंबई महापालिकेला पाणी पुरवठासाठी केला जातो. मात्र शहापूर तालुक्यामध्ये तीव्र पाणी टंचाई आहे. यापूर्वी झालेल्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे, सुमारे १२५ कुटुंबांचे पुनर्वसन केले पाहीजे, मात्र शासनाचे या प्रश्नाकडे दुर्लक्ष आहे. प्रकल्पग्रस्तांना नोकरी दिलेली नाही. या पार्श्वभुमीवर हा प्रकल्प होऊ देणार नाही. आज महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे. अशावेळी सिंचनाचा प्रकल्प हाती घेणे योग्य नाही. या प्रकल्पास जनतेचा संपूर्ण विरोध आहे. मागील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे प्रश्न आधी सोडविले पाहिजे. शेतकऱ्यांचे समाधान होईपर्यंत प्रकल्पाबाबत कोणतीही बैठक घेऊ नये. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. जनतेचा संपुर्ण नकार असल्यामुळे आजची बैठक रद्द करावी. संघर्ष समितीने आपले म्हणणे या ठिकाणी सादर करावे व याबाबत शासन स्तरावर बैठक लावावी असे मा. आमदार महोदयांनी सांगितले.

**श्री. पद्‌माकर वानवा, शेतकरी**

सदर धरण होऊ नये, धरणामुळे शेतकऱ्यांची जमीन बुडीत क्षेत्रामध्ये जाणार आहे. नागरिक, गुरं–ढोरं यांचे हाल होणार आहेत. गेली २५ वर्षे संघर्ष चालू आहे. सदर प्रकल्पास संपूर्ण विरोध आहे. प्रकल्पाच्या विरोधात १३१ लोकांनी स्वाक्षऱ्या केल्या तर प्रकल्पाच्या समथनार्थ निरंक लोकांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यानंतर अध्यक्ष महोदयांनी असे सांगितले की, आपणा सर्वांच्या तोंडी व लेखी सुचना व हरकती यांची नोंद घेण्यात आली आहे. व त्यानंतर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

सुजीत ढोलम 29/10/2009

**(सुजीत ढोलम)**
**समन्वयक**
**उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, कल्याण ३**

**(अशोक शिनगारे)**
**समिती अध्यक्ष**
**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, ठाणे**

**Minutes of the Environmental Public Hearing for proposed project of Mumari Dam, under Bhatsa Irrigation Project, Mauje Sarangpuri, Tal.-Shahapur, Dist.-Thane.**

Executive Engineer, Bhatsa Dam Div. No.1, Bhatsanagar, Tal.-Shahapur, Dist.-Thane has submitted the proposal to conduct public hearing for their proposed project of Mumari Dam, under Bhatsa Irrigation Project, Mauje Sarangpuri, Tal.-Shahapur, Dist.-Thane. In this regard Maharashtra Pollution Control Board (M.P.C.B.) has conducted the environmental public hearing on 06.10.2015 at 11.00 a.m. at Community Centre, Bhatsa Nagar Vasahat, Tal.-Shahapur, Dist.-Thane. During the public hearing, the following public hearing panel members were present.

| | |
|---|---|
| Shri. Ashok Shingare,<br>Additional District Magistrate,<br>Thane.<br>(Representative of District Magistrate, Thane) | Chairman of the Committee |
| Shri. Sujit Dholam,<br>Sub Regional Officer,<br>M.P.C. Board, Kalyan | Convener of the Committee |

Dr. J.B. Sangewar, Regional Officer, M.P.C. Board, Kalyan and Shri. Sanjay Sarvade, Sub Divisional Officer, Bhiwandi were also present at the time of public hearing.

**Shri. Sujit Dholam, Convener of public hearing Committee** has welcomed all the public present & with the due permission of the Chairman of the Committee, the work of public hearing proceeded. He explained that, Executive Engineer, Bhatsa Dam, Div. No.1, Bhatsanagar, Tal.-Shahapur, Dist.-Thane has submitted the proposal to conduct Environmental public hearing for their proposed project of Mumari Dam, under Bhatsa Irrigation Project, Mauje Sarangpuri, Tal.-Shahapur, Dist.-Thane. As per the provisions of the EIA notification dtd. 14 September 2006, of Ministry of Environment and Forest, Government of India. M.P.C. Board has published advertisement in Marathi newspaper Dainik Sakal dtd. 04.09.2015, English

newspaper Free Press Journal dtd. 04.09.2015 and in Marathi newspaper Tarun Bharat dtd. 05.09.2015, one month before this public hearing. The copy of environment impact assessment report as submitted by the project proponent and other documents pertaining to this project were placed in the office of District Collector, Thane, Dist.-Thane., Chief Executive Officer, (CEO), Zilla Parishad, Dist.-Thane, General Manager, District Industries Center, Dist.-Thane, Tahasildar, Shahapur, Tahasil Office, Tal.-Shahapur, Dist.-Thane., Block Development Officer, Panchayat Samiti, Shahapur, Tal.-Shahapur, Dist.-Thane., Regional Office, MPC Board, Kalyan., M.P.C. Board, Kalpataru Point, 3rd floor, Opp. Cine planet, Sion Circle, Sion (E), Mumbai-32., Environment Department, Govt. Of Maharashtra, New Adm. Bldg.,15th Floor, Madam Kama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032. Grampanchayat office, Sarangpuri (Sarangpuri and Khaire) Tal.-Shahapur, Dist.-Thane, Grampanchayat office, Junavani (Junavani and Sakhadbav), Tal.-Shahapur, Dist.-Thane, Grampanchayat office, Kothare, Tal.-Shahapur, Dist.-Thane. So as to have access to the concerned public for reference and scrutiny of the details of Public hearing document, concerned public were requested to file their objections/ suggestions/ views etc. He informed that the participant who want to submit their suggestions/ objections can submit the same after the presentation of the project proponent. The minutes of the public hearing will be submitted to the Environment Department. The role of this committee is to record objections, questions, suggestions, queries of the public and submit it further. This committee shall not take decision about the proposed project. After permission of Hon'ble Chairman of the committee, Shri Sujit Dholam, requested the project proponent to give the presentation regarding the proposed project and requested the Chairman of the committee to conduct the public hearing.

**Chairman of the committee** explained in brief the purpose and process of public hearing to the public present. Project proponent shall do the detailed presentation about the proposed project explaining the technical details. Thereafter public can express their views/ objections. Also the same can be submitted in written, which shall be duly acknowledged by M.P.C. Board. Project proponent shall give clarifications regarding the objections filed. After the completion of presentation by project proponent

there will be a session of questions and answers, wherein discussions will be held for clarifying the views/ objections expressed by the public. He also requested the public present to hear the presentation peacefully and express their views in democratic way during the course of discussions. The views/ objections expressed by the public shall be recorded in the minutes of public hearing to be submitted further to Ministry of Environment Forest. Thereafter Chairman of the Committee requested the project proponent to give presentation.

Shri. Adhikrao Yevale, from MITCON Consultancy gave the presentation on behalf of Water Resources Department with the help of slide show. His presentation included introduction, geographic characteristics, salient features of the project, map of proposed project, catchment area, submergence area, command area, study of environmental aspects, social and economic situations, environment impact assessment, environment management plan.

During the course of presentation public started agitating and sloganeering, demanding to stop the process of public hearing and opposing the proposed project. Due to this project presentation was interrupted. Shri. Padmakar Namdeo Kevari, President, Mumri Dharan Sangharsh Samiti, requested the public to maintain peace and then delivered speech explaining the cause of oppose from public.

**<u>Shri. Padmakar Namdeo Kevari, President, Mumri Dharan Sangharsh Samiti:-</u>**

Information in the Presentation & Environment report is totally wrong. While conducting the meeting regarding the said project, the project affected people, MLA and public representatives have not been taken into confidence. We are opposing the presentation which is being shown in today's public hearing. We do not know what is given in the newspaper and the farmers are not taken into confidence regarding the same. There are five to six dams in Shahapur taluka. You cannot construct a dam within 10 kms of a distance from a big dam. Here the distance is less than 2 km and you are showing this within the rules.

The rehabilitation problem of Bhatsa PAP's is still not resolved since last 25 to 30 years. The project affected farmers are still not being taken care off. Government has not taken any decision to resolve their problems. The land which is selected for our rehabilitation is still not shown to us. This shows that Government is taking advantage of our illiteracy. We are strongly opposing the dam. Government is earning so much of revenue. Had the Government been spending even 1 paisa per gallon of water on affected farmers, it would be sufficient. Kalyan Municipal Corporation and other Municipal Corporation are receiving water from this place, how many youth from Shahapur have got the jobs in these Municipal Corporations. We are the citizens of this nation and living in the mountains. According to tribal act, you cannot construct a dam where it is opposed. Your presentation is ready. The documents are also ready. But this information is false and is prepared in a single room. Actually we had to conduct a meeting but principally this information is not true.

The condition of Shahpur taluka is getting changed like Marathwada. The situation is getting worst and you are showing the good picture in the presentation. So many problems are still pending till date. So many meetings were held with us but we are not satisfied with that. Government is not coming forward to resolve our issues, how can we give our own land for the project. Today what is happening here should be reflected in the proceedings. The information of 34 houses getting affected is completely wrong. There is lot of plain land and a huge population in the submergence area. 13 padas in the 4 Grampanchayats are getting affected. The lot of population will be affected with this project. The farmer will loose their land in the submergence and they will become landless. The public present here have registered their oppose and it should be mentioned in the proceedings.

Stop the public hearing. The proposed dam site is coming under the seismic zone and this dam is earthen dam. Hence this dam is in danger. The PAP's of this dam should have been given alternative land and jobs. But there is no

proposal regarding that. The water stored in the dam is supplied to companies like Coca Cola, but the rehabilitation proposal for the PAP's is not submitted. We should get jobs, we should get the alternative land having same area which is going under submergence. The proposal for getting the rent for the land which is going under submergence is raised by us but no action is taken. We are opposing the project fully.

**Shri. Narayan Mahalunge, Member, Mumri Dharan Sangharsh Samiti:-**

I am one of the project affected person of Bhatsa project. My land was submerged in Bhatsa project. However rehabilitation is not done till date since last 46 years. Lot of farmers have lost their land and houses in the Bhatsa project, however employment is not offered. Rehabilitation is not done. Rivers like Tansa and Vaitarna are flowing in the Shahapur taluka. However there is water scarcity in the villages in this taluka. Water from these rivers is supplied to Mumbai Municipal Corporation.

Thereafter, Shri. Padmakar Namdeo Kevari, requested to maintain two different musters for the attendance. People who are supporting the project and those who oppose to the project, shall sign in two different registers. Chairman of the committee has shown consent to this suggestion and instructed to make two different registers for signatures of the attendees.

**Shri. Ganpat Khadke, Vice President, Mumri Dharan Sangharsh Samiti:-**

Drinking water is not supplied to the villagers. Project affected people are not being offered with land, employment rehabilitation. Government have not fulfilled the promises given to project affected people. People losing their land in the proposed project shall face the problem of unemployment and may end up with severe public anger.

**Shri. Pandurang Barora, MLA :-**

Problem of water scarcity is very severe in the villages of Shahapur taluka. Water from the rivers of these taluka is supplied to Mumbai Municipal Corporation. However water scarcity is faced by Shahapur taluka. Rehabilitation of about 125 families affected due to earlier project shall be made on priority. However Government is ignoring this issue. Employment is not offered to the project affected people. We shall not let this project to implement. There is drought situation in Maharashtra. Problem of drinking water is severe. It is improper to take up irrigation project in such situation. Public has shown their complete oppose to this project. Rehabilitation of earlier project affected people shall be done. Meeting shall not be conducted until farmers are satisfied. Drinking water problem is severe. Since public is having complete oppose, meeting shall be suspended. He proposed that Sangharsh Samiti shall present their say and meeting shall be conducted at Government level.

**Shri. Padmakar Vanva, Farmer:-**

This dam project shall not be implemented. Farmers land is going under submergence area. Citizens and cattle's are going to suffer. Since last 25 years struggle is going on. There is complete oppose to the project.

In total 131 people have signed on the register opposing the project, whereas no citizens have signed in favour of the project.

Thereafter Chairman of the committee informed that all oral and written suggestions/ objections are recorded and declared that public hearing is concluded.

31\10\2015

**(Sujit Dholam)**
**Convener of the Committee**
**Sub Regional Officer,**
**M.P.C. Board, Kalyan III**

**(Ashok Shingare)**
**Chairman of the Committee**
**Additional District Magistrate, Thane.**